महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम
नियमावली पुस्तिका १९८४ मधील परिशिष्ट
४२ अ.क्र.७० मध्ये उल्लेखिलेल्य मोजमापे
तपासणीच्या अधिकारात सुधारणा करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
शासन परिपत्रक क्र.संकीर्ण १०९७/सीआर ६२२/इमारती २
दिनांक :- २२/८/२००५.

## परिपत्रक

**संदर्भ:- १)** शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.डीपीडब्ल्यू ११८९/(५७)/लेखा परीक्षा दि.१८ नोव्हेंबर १९९६
२) शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.संकीर्ण १०९७/सीआर-६२२/ इमारती-२ दि.२९ जून १९९९

सार्वजनिक बांधकाम विभाग व पाटबंधारे विभागामधील क्षेत्रिय अधिकाऱ्यांना सार्वजनिक बांधकाम नियमावलीतील परिशिष्ट ४२ अन्वये विविध अधिकार प्रदानकरण्यात आले आहेत. हे अधिकार संदर्भीय दि. १८/११/१९९६ च्या शासन निर्णयान्वये वाढविण्यात आले आहेत. तसेच महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका १९८४ मधील परिशिष्ट २४ खालील नियम ११ मध्ये उल्लेखिलेल्या मोजमापे नोंदणीच्या अधिकारांच्या अनुसूचीमध्ये संदर्भाधीन शासन निर्णय दि.२९/६/९९ अन्वये सुधारणा करण्यात आली आहे.
सार्वजनिक बांधकाम नियमावलीतील परिशिष्ट ४२ अनुक्रमांक ७० अन्वये कंत्राटी, उक्त्या कामाच्या, दरसूचीद्वारे पार पाडण्यात आलेल्या कामाची अंतिम मोजमापे तपासणीबाबतचे अधिकारांची व्याप्ती देखिल संदर्भाधीन शासन निर्णय दि.२९/६/९९ अन्वये स्पष्ट करण्यात आली आहे.

तथापि शासनाकडे प्राप्त होणारी चौकशी प्रकरणे, दोषारोपपत्रे यावरुन असे प्रकर्षाने निदर्शनास येत आहे की, उक्त दोन्ही शासन निर्णयातील सूचनांचे पालन काटेकोरपणे क्षेत्रिय अधिकाऱ्यांकडून होत नाही. विशेषत: क्षेत्रिय कार्यकारी अभियंता यांचेकडून विहीत टक्केवारीनुसार मापांची तपासणी केली जात नाही वा केवळ औपचारिकता म्हणून कामातील

महत्वाच्या बाबी जसे खोदकाम, भरावाचे काम, झाकली जाणारी मापे इत्यादी बार्बी सोईस्करपणे वगळून अन्य बार्बीच्या मापांची तपासणी दर्शविण्याची प्रवृत्ती क्षेत्रिय कार्यकारी अभियंता वर्गात वाढत आहे. तसेच विशेष दुरुस्ती वा विविक्षीत दुरुस्तीची कामे रु. २.५० लक्ष पेक्षा कमी रकमेची असल्यामुळे संदर्भाधीन शासन निर्णय क्र.२ मधील सुचनांचा आधार घेवून अशा कामांची मापे तपासण्याचे क्षेत्रिय कार्यकारी अभियंता टाळतात. परंतु वरीलप्रमाणे मापे तपासणीची विहीत टक्केवारी ही किमान आहे, याकडे मात्र कार्यकारी अभियंता दुर्लक्ष करतात.

सार्वजनिक बांधकाम विभागाकडे शासनाच्या मालकीच्या सर्व इमारतीची देखभाल दुरुस्ती करण्याची जबाबदारी आहे. यापैकी अनेक इमारती ४० वर्षापेक्षा अधिक जुन्या असून त्यांचे देखभाल दुरुस्तीवर मोठया प्रमाणात दरवर्षी खर्च होत असतो. तसेच रस्ते देखभाल दुरुस्तीकरीता १.४० लक्ष कि.मी.लांबीचे रस्ते असुन हे रस्ते वाहतूकीस सुस्थितीत ठेवणे करीता नियमित देखभाल दुरुस्तीची कामे करण्यात येतात व यावर देखिल मोठया प्रमाणावर निधी खर्च होत असतो.

उपलब्ध साधन सामुग्री व मर्यादित वित्तीय उपलब्धता विचारात घेता इमारती व रस्त्यांचे देखभाल दुरुस्तीवर होणाऱ्या खर्चावर क्षेत्रिय कार्यकारी अभियंता यांचे प्रभावी नियंत्रण असणे अत्यांवश्यक झाले आहे. सध्या कार्यकारी अभियंता यांना रु. २.५० लक्ष पर्यन्तच्या कामांची मापे तपासणी करण्याचे बंधन नसल्याने प्रभावी नियंत्रण ठेवले जात नाही असा अनुभव आहे. तेंव्हा इमारती व रस्ते देखभाल दुरुस्तीचे कामांचे मापे तपासणीचे मानकामध्ये फेरबदल करणेची निकड निर्माण झाली आहे.

रस्ते सर्वसाधरण दुरुस्ती व इमारतीची सर्व प्रकारची देखभाल दुरुस्तीची कामे कार्यकारी अभियत्याच्या नियंत्रणामध्ये कार्यान्वित होवून रस्ते व इमारतीचे देखभाल दुरुस्तीमध्ये गुणात्मक बदल व्हावा व उपलब्ध अनुदानामध्ये दुरुस्तीचे माध्यमातून उत्तम सेवा प्रदान व्हावी असा विभागाचा दृष्टीकोण आहे

वरील बाबतीत सांगोपांग विचार करुन आता शासन खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

१) कंत्राटे, फुटकळ कामे, दरसूची व निवीदानुसार केलेल्या कामांची मापे तपासणी शासन निर्णय दि.१८/६/९९ मधील सुचनानुसार काटेकोरपणे करण्यात यावी.

२) प्रच्छन्न मापे (Hidden Measurements) विशेषतः मातीकाम, खोदकाम, पुलांचे पायव्याचे काम, बी.बी.एम. इत्यादी बाबींची किमान ५ टक्के मापे तपासणी क्षेत्रिय कार्यकारी अभियंता यांनी करणे बंधनकारक राहील.

३) ज्या कामात करारनाम्यात दर्शविलेल्या परिमाणापेक्षा एखाद्या बाबीचे परिमाणात २५ टक्केपेक्षा ज्यादा वाढ होत असेल व या बाबी निवीदेच्या कलम ३७/३८ खाली नियंत्रित होत असतील तर अशा सर्व बाबींची ५ टक्के मापे तपासणी क्षेत्रिय कार्यकारी अभियंता यांनी करणे बंधनकारक राहील.

४) इमारतीची सर्वसाधारण दुरुस्ती, विशेष दुरुस्ती, विविक्षित दुरुस्ती व रस्त्यांची सर्वसाधारण दुरुस्ती या सदरात केल्या जाणाऱ्या कामाची अंदाजित रक्कम रु.२.५० लक्ष पेक्षा कमी असली वा अंतिम देयकाची रक्कम रु. २.५० लक्ष पेक्षा कमी होत असली तरी ज्या कामांचे मूल्य १ लाखापेक्षा अधिक असेल अशा बाबतीत अंतिम मोजमापाची सहाय्यक कार्यकारी अभियंता/सहाय्यक अभियंता (वर्ग-२)/उप अभियंता/उप विभागीय अधिकारी/ अभियंता यांनी १०० टक्के तपासणी करावी व अशा प्रकरणी क्षेत्रिय कार्यकारी अभियंता यांनी अंतिम मोजमापांची किमान ५ टक्के तपासणी करणे अनिवार्य राहील.

५) खोदकाम, मातीकाम, भरावाचे काम, खडीकरण व डांबरीकरण अशा बाबींची मोजमापे भुमापन पातळया (Ground Levels/ Reduced Levels) वर आधारित असल्यास अशा अंतिम पातळयांची १०० टक्के तपासणी उप विभागीय स्तरावरील आधिकाऱ्याने करावी आणि अशा अंतिम पातळयांची किमान ५ टक्के तपासणी क्षेत्रिय कार्यकारी अभियंता यांनी करणे अनिवार्य राहील.

६) वरील अ.क्र. २ ते ५ खालील मापे तपासणी ही शासन निर्णय दि. १८/६/९९ मधील सूचनांचे व्यतिरिक्त राहील याची क्षेत्रिय कार्यकारी अभियंता यांनी नोंद घ्यावी.

७) वरील अ.क्र. १ ते ५ बाबींनुसार कार्यकारी अभियंताद्वारे केलेली मापे तपासणी दर्शविणारे नोंदवही म.सा.बां. नियमावली परिशिष्ट २४ नियम ११ अ.क्र.चार (आय) खालील विहीत नमुन्यात ठेवण्यात यावी.

उपरोक्तप्रमाणे बदल तात्काळ अंमलात येतील. सदर परिपत्रक जलसंपदा विभागाच्या सहमतीने व अनौपचारिक संदर्भ क्रमांक १५५२, दिनांक २१/५/२००५ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

( हि. अ. श्रीमाळ )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

महालेखापाल-१, मुंबई/महालेखापाल-२, नागपूर,
सचिव (रस्ते), , ह्यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक, सार्वजनिक बांधकाम विभाग
सचिव (बांधकामे) ह्यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक, सार्वजनिक बांधकाम विभाग
प्रधान सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय,
सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय,

प्रत माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी -

सर्व मुख्य अभियंते, सा.बां.विभाग/जलसंपदा विभाग,
सर्व उप सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई,
व्यवस्थापकीय संचालक, शहर व औद्योगिक विकास महामंडळ, (सिडको), निर्मल बिल्डींग, नरीमन पॉइंट, मुंबई,
महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ,
अधीक्षक अभियंता व प्रादेशिक अधिकारी, भूपृष्ठ वाहतूक मंत्रालय, मुंबई,
सर्व अधीक्षक अभियंते, सा.बां.विभाग/पाटबंधारे विभाग,
संचालक, उपवने आणि उद्याने, मुंबई,
प्रतिनियुक्तीवरील सर्व अधिकारी,
सर्व कार्यकारी अभियंते, सा.बां.विभाग/जलसंपदा विभाग/जिल्हा परिषद,
सर्व अधिकारी/कार्यासन अधिकारी, सा.बां.विभाग/पाटबंधारे विभाग, मंत्रालय,
कार्यासन इमारती-२, (निवड नस्ती)